**नि.दि.दा.क्र.१८/२०१९, अर्ज निशाणी ७८ खालील आदेश**

(CNR MHSI080002232019)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाही'' आदेश रद्द करुन, त्यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेस विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत दाव्याकामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत दिली आहे. यापुर्वीच्या तारखेला म्हणजे दि.२७/३/२०२४ रोजी प्रस्तूत खटला वादीच्या जादा सरतपासाकरीता असल्याने, पुढील तारखेस उलटतपास करणेच्या विचाराने ते दि.२७/३/२०२४ रोजी न्यायालयात उपस्थित राहीले नाहीत. तरी कैफियतीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे वादीचा उलटतपास करण्याची संधी मिळावी अन्यथा प्रतिवादींचे नुकसान होण्याची शक्यता आहे त्यामुळे उलटतपास घेणेस परवानगी मिळणेकरीता विनंती केली आहे.

०२. वादीने सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्ज पूर्णपणे खोडसाळ असून अर्जात नमुद कारण सकृतदर्शनी विचारात घेण्यासारखे नाही. प्रतिवादी यांनी न्यायालय कामकाज गृहित धरुन त्याप्रमाणे कामकाज चालावे असे कारण दिसते. त्यामुळे, अर्जातील कारण विचारात घेता अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. यदाकदाचित अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादी यांचे वय लक्षात घेता वादी सध्या मुंबई येथे उपचारार्थ गेले असल्याने वादी यांचा येण्याजाण्याचा खर्च विचारात घेता तसा जास्तीत जास्त खर्च प्रतिवादीकडून वादीस देण्यात यावा अशी

विनंती केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सदर दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा अंतिमतः निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास सर्व निर्णायक वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यामुळे, अर्जदार/प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रतिवादी/अर्जदार यांचेकडून झालेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून वादीला खर्च देण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

१. निशाणी क्र.७८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.५००/-(रूपये पाचशे फक्त) वादीस द्यावेत.

३. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID

Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.04.12 11:04:55 +0530

दिनांक – १०/०४/२०२४

(टी.एच.शेख)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय
वैभववाडी.